


दैनिक **अक्षराज** — अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी... कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ३६१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.११ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# एसटी कर्मचाऱ्यांना दिलासा, रखडलेला पगार आज होणार!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** दर महिन्याच्या ७ तारखेला अदा होणारे एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन प्रशासकीय दिरंगाई आणि सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे यंदा काहीसे लांबले. मात्र, एसटी महामंडळाच्या तब्बल ८६ हजार कर्मचाऱ्यांचे जुलै महिन्याचे वेतन उद्या, ११ ऑगस्ट रोजी त्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



एसटी महामंडळाकडून दर महिन्याला शासनाच्या विविध सवलतींच्या प्रतिपूर्ती रकमेची माहिती वित्त विभागाला नियमितपणे सादर केली जाते. जुलै महिन्याची माहितीही वेळेत सादर करण्यात आली होती. मात्र, शासनाकडून प्रतिपूर्तीची रक्कम वेळेत प्राप्त न झाल्याने कर्मचाऱ्यांच्या वेतनावर परिणाम झाला. साधारणपणे महिन्याच्या ७ ते १० तारखेपर्यंत एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केले जाते. परंतु, यावेळी सलग आलेल्या सुट्ट्या आणि प्रशासकीय प्रक्रियेला झालेल्या विलंबामुळे वेतन १० तारखेनंतर गेले.

**प्रताप सरनाईक यांचा अधिकाऱ्यांशी संवाद**

कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत व्हावे यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राजशिष्टाचार बाजूला ठेवून थेट वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वारंवार संवाद साधला. त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रतिपूर्ती रकमेबाबतचा शासन निर्णय आज प्राप्त झाला असून, ११ ऑगस्ट रोजी सर्व एसटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये वेतन जमा होणार आहे. दरम्यान, यापुढे वेतन अदा करण्यास कोणत्याही प्रकारचा विलंब होता कामा नये, अशा स्पष्ट सूचना मंत्री सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**पगाराच्या विलंबाने कर्मचाऱ्यांचं आर्थिक गणित बिघडतं**

वेतनाला विलंब झाल्यास त्याचा थेट परिणाम एसटी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक नियोजनावर होतो. बँकेचे कर्जाचे हप्ते वेळेत न भरल्यास अतिरिक्त व्याज किंवा दंडाचा भुर्दंड कर्मचाऱ्यांना सहन करावा लागतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या या अडचणींचा गांभीर्याने विचार करून एसटी प्रशासन आणि शासनाच्या वित्त विभागाने यापुढे अधिक प्रभावी समन्वयाने काम करावे, असे निर्देशही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. भविष्यात अशा प्रकारची दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत, असेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

**पगाराला इतका विलंब का?**

एसटी कर्मचाऱ्यांचा पगार हा राज्य सरकारकडून मिळणाऱ्या सवलत मूल्य प्रतिपूर्तीच्या निधीवर होतो. राज्य सरकारकडून प्रवाशांना विविध सवलती दिल्या जातात. या सवलतींची रक्कम राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला दिला जातो. ही रक्कम प्रतिपूर्तीच्या माध्यमातून एसटी महामंडळाला मिळते.

एसटी महामंडळाने २९ विविध सवलतीच्या योजनांची माहिती एसटी माहिती राज्य सरकारला दिली आहे. तसेच आवश्यक कागदपत्रेदेखील सादर केले आहेत. मात्र निधी मंजूर करण्यासाठी अर्थ खात्याकडून सातत्याने नवनवीन माहिती आणि खुलासे मागवले जात असल्याचा आरोप कर्मचारी वर्गाकडून करण्यात आला होता. परिणामी सवलत मूल्य प्रतिपूर्तीचा निधी न मिळाल्याने कर्मचाऱ्यांचा पगार रखडल्याची माहिती आहे. पण आता निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे आता तरी एसटी कर्मचाऱ्यांचा पगार होणं अपेक्षित आहे.






# एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी; तिचे बळकटीकरण हीच आमची प्राथमिकता : आ. मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, बल्लारपूर (चंद्रपूर) :** एसटी ही सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनातील अत्यंत महत्त्वाची सेवा असून, विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, महिला, कामगार आणि व्यापाऱ्यांच्या प्रवासाला अधिक सुरक्षित व सक्षम करण्यासाठी एसटीचे बळकटीकरण आवश्यक आहे. एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी; तिचे बळकटीकरण हीच आमची प्राथमिकता, असे प्रतिपादन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या या पाच नव्या बसेसचे लोकार्पण आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते बल्लारपूर येथे फीत कापून करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, विभाग नियंत्रक अशोक वाडीभस्मे, सहाय्यक विभागीय नियंत्रक छगन दिवसे, शहराध्यक्ष रणंजय सिंग, काशी सिंग, लखनसिंग चंदेल, रेणूकाताई दूधे, सारिका कनकम, देवा वाडकर आदिंची उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार म्हणाले की, जिल्ह्यातील जनता आणि प्रवाशांच्या सेवेसाठी एखादी गोष्ट परिपूर्ण होत असेल, तेव्हा मला मनापासून आनंद होतो. एसटी ही केवळ वाहतुकीची सेवा नसून अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. विद्यार्थी परीक्षेला जाण्यासाठी बसचा वापर करतो, शेतकरी आणि शेतमजूर बाजारपेठेत जाण्यासाठी बसवर अवलंबून असतात, तर महिलांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी एसटी अत्यंत महत्त्वाची आहे,असे त्यांनी सांगितले.

एसटीच्या प्रवाशांची संख्या कमी होत असून त्यामागे बसेसची दुरावस्था आणि बसस्थानकांवरील अपुऱ्या सुविधाही कारणीभूत आहेत. त्यामुळे केवळ नवीन बसेस उपलब्ध करून देणे नव्हे, तर बसस्थानके आणि संपूर्ण वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे आवश्यक आहे, असे आ.सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

**पेपर मिलनंतर नव्या रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर**

बल्लारपूरची अर्थव्यवस्था १९५३ पासून पेपर मिलशी जोडलेली आहे. मात्र, नव्या पिढीला विविध क्षेत्रांत रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्य राखील पोलीस दलाचा प्रकल्प



बल्लारपूरच्या परिसरात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे भविष्यात या परिसरात विविध व्यवसायांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.शिक्षण आणि आरोग्य हे बल्लारपूरच्या विकासाचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ असून एसएनडीटी विद्यापीठाचे उपकेंद्र आणि ईएसआयसी रुग्णालयाच्या माध्यमातून या दोन्ही क्षेत्रांना मोठी ताकद मिळणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

**कल्याण मंडपमसाठी प्रयत्न सुरू**

सुमारे १० एकर जागेत महिलांसाठी औद्योगिक वसाहत तसेच विवाह व सामाजिक कार्यक्रमांसाठी कल्याण मंडप उभारण्याचा प्रस्ताव असून, हे दोन्ही प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आपले प्रयत्न सुरू असून त्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्यात येत असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले.

# शहर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील खापरखेड्याला भेट देणार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** खापरखेडा मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्ट रोजी दगडी चाळ टोळीने घडवून आणलेल्या रक्तरंजित गँगवार आणि प्राणघातक हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण खापरखेडा परिसर हादरला या हल्यात तीन जण गंभीर जखमी झाले असून या घटनेचे तीव्र पडसाद राजकीय वर्तुळात उमटले आहेत या पार्श्वभूमीवर नागपूरचे शहर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील येत्या एक-दोन दिवसांत खापरखेडा पोलीस ठाण्याला भेट देऊन स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधणार आहे. यावेळी खापरखेडा येथील सर्व पक्षीय राजकीय शिष्टमंडळाला दगडी चाळ गँगवार प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

सोमवार, १० ऑगस्ट रोजी शहर पोलीस आयुक्त कार्यालयात राज्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत खापरखेडा येथील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांची भेट घेऊन मुख्य बाजारपेठेतील दगडी चाळ गँगवार, परिसरात सुरू असलेले अवैध धंदे व एमडीचा मुद्दा उपस्थित केला

**ठाणेदाराला सक्तीच्या रजेवर पाठवा !**

**खापरखेडा पोलिसांच्या भूमिकेवर कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह...**

खापरखेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर आणि गुन्हेगारांचे लागेबांधे असल्याचा आरोप होतो आहे दगडी चाळ टोळीचा मुख्य सूत्रधार सूरज कावळे आणि शुभम उर्फ शेरू उईके हे तडीपार असतानाही नुकत्याच झालेल्या कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान ताब्यात घेतलेल्या कुख्यात सूरज कावळे रेकार्डवर असतांना पोलिसांनी सुचनापत्र देऊन सोडून दिल्याचा आरोप आहे.

शिवाय पोलीस ठाण्यात सराईत गुन्हेगारांना बसायला खर्ची दिल्या जात असल्याचा आरोप स्थानिकांचा आहे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांचे दगडी चाळ टोळीशी संबंध असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे त्यामूळे दगडी चाळ गँगवार प्रकरणाचा पारदर्शक तपास होने अपेक्षित आहे त्यामूळे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

यापूर्वी ९ ऑगस्ट रोजी कोराडी येथे आयोजित पालकमंत्र्यांच्या जनता दरबारातही गँगवार प्रकरणाचा मुद्दा गाजला होता. पालकमंत्र्यांनी गंभीर दखल घेत पोलीस आयुक्तांना गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. सोमवार १० ऑगस्टला पार पडलेल्या बैठकीत पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी स्वतः खापरखेड्याला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्याचे व नागरिकांशी संवाद साधण्याचे आश्वासन दिले.

बैठकीला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषद आमदार डॉ. राजीव पोतदार, माजी आमदार सुधाकर कोहळे, जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी व शिष्टमंडळाचे सदस्य उपस्थित होते.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेतील या रक्तरंजित घटनेनंतर सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, खापरखेडा परिसरात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. घटनेला १० दिवस होत आहेत तरी सुद्धा गँगवार प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह डझनाहून अधिक आरोपी पसार आहेत.

# कासा येथे आदिवासी दिनाचा जल्लोष !

## हजारोंच्या सहभागातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.१०, डहाणू (पालघर) :** जागतिक आदिवासी दिनानिमित्त डहाणू तालुक्यातील कासा येथे रविवारी आदिवासी संस्कृती, परंपरा आणि एकतेचे अनोखे दर्शन घडले. कासा उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला सुमारे २० हजारांच्या आसपास आदिवासी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांचा निनाद, आदिवासी नृत्य, पारंपरिक वेशभूषा आणि डीजेच्या तालावर निघालेल्या भव्य प्रभातफेरीमुळे कासा परिसर आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगून गेला होता.

९ ऑगस्ट रोजी सकाळपासूनच कासा, चारोटी परिसरात आदिवासी बांधवांची मोठी गर्दी होऊ लागली होती. चारोटी येथून पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रभातफेरीला सुरुवात करण्यात आली. शेकडो ढोल, ताशे व इतर पारंपरिक वाद्यांच्या तालावर तसेच डीजेच्या संगीतावर तरुणाईसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले मोठ्या उत्साहाने सहभागी झाली होती.

प्रभातफेरी शूर झलकरी चौकात पोहोचल्यानंतर तेथे अभिवादन करण्यात आले. त्यानंतर चारोटी ते कासा अशी रॅली काढण्यात आली. कासा येथील भगवान बिरसा मुंडा चौकात भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला अभिवादन करून पुन्हा प्रभातफेरी काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेतील महिला-पुरुष, हातात पारंपरिक वाद्ये आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध चित्ररथ यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यानंतर कासा कन्या छात्रालयाच्या मैदानावर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भगवान बिरसा मुंडा, पहिले आदिवासी डॉक्टर मधुकर डगला, आदिवासी आमदार भाई कडू तसेच आदिवासी क्रांतिवीरांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

**'सोयीन' महिलांचा विशेष सन्मान !**

यंदाच्या जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात आदिवासी समाजातील पारंपरिक आरोग्यसेवेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या 'सोयीन' महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. पिढ्यान्पिढ्या ग्रामीण व आदिवासी भागात महिलांच्या आरोग्याशी संबंधित पारंपरिक पद्धतीने सेवा देणाऱ्या या महिलांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

याशिवाय आदिवासी समाजातील एमपीएससी व लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून अधिकारी झालेले, एमबीबीएस डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. शिक्षण आणि सामाजिक प्रगतीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाला माजी समाजकल्याण सभापती पांडुरंग बेलकर,आदिवासी एकता संस्थेचे अध्यक्ष सुरेश पाडवी माजी डहाणू पंचायत समिती सभापती देवू बालसी, माजी पंचायत समिती सभापती स्नेहलता सातवी, माजी जिल्हा परिषद सदस्य लतिका बालसी, कासा ग्रामपंचायतीच्या सरपंच सुनीता कामडी , तवा ग्रामपंचायतीचे सरपंच लहू बालशी, डॉ. विश्वास वळवी, सुदाम कदम यांच्यासह कासा उत्सव समितीचे कार्यकर्ते अजय तुंबडा, रामा गोवारी, संतोष कोरडा आदी उपस्थित होते.

**आदिवासी संस्कृतीचे जतन करण्याचा संकल्प !**

जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आदिवासी समाजाच्या रूढी-परंपरा, संस्कृती, बोलीभाषा आणि पारंपरिक कला यांचे जतन व संवर्धन करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. आदिवासी समाजाने शिक्षण, आरोग्य आणि विविध क्षेत्रांत पुढे जाताना आपल्या संस्कृतीशी असलेली नाळ कायम ठेवावी, असा सूर यावेळी मान्यवरांच्या भाषणातून व्यक्त करण्यात आला.

कासा उत्सव समितीच्या नियोजनातून झालेल्या या भव्य आयोजनात हजारो आदिवासी बांधवांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतल्याने संपूर्ण कासा परिसरात आदिवासी एकता आणि सांस्कृतिक अभिमानाचे चित्र पाहायला मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कासा उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

संपादकीय

## कोणते कार्ड घ्यावे हाती!

मार्केटिंगवाल्यांच्या प्रलोभनांपायी तुम्ही कितीही क्रेडिट कार्डे घेतलीत, तरी प्रत्यक्ष वापराच्या वेळी त्यातल्या कितीशा सुविधांचा लाभ होतो, हा प्रश्नच असतो. आपल्या पाकिटात अशा कार्डांची जंत्री तरी किती बाळगावी, हाही मुद्दा असतो. वाहतूकसाधने आणि सरकारी सवलतींसाठी तर इतकी कार्डे काढावी लागतात, की सवलतींपेक्षा ती काढण्याच्या त्रासातच नागरिकांची दमछाक होते.

एसटीने सुरू केलेल्या स्मार्ट कार्डामुळे ठिकठिकाणचे प्रवासी सध्या असेच कातावले आहेत. वरिष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना बसभाड्यात सवलत, अतिज्येष्ठांना मोफत प्रवास अशा योजना एसटी देते. मात्र आता त्यासाठी राष्ट्रीय सामाईक मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) काढणे अनिवार्य झाले आहे. त्याचे टोकन घेण्याकरिताही तासन् तास लोक रांगेत ताटकळत उभे होते. आपला नंबर लागल्यानंतरही महिनाभराने लोकांना कार्ड मिळणार आहे. ज्येष्ठांनी वरिष्ठ नागरिकांसाठीची ओळखपत्रे यापूर्वी घेतली आहेतच. प्रत्येकाकडे एव्हाना आधार कार्ड आहेच. तरी मग अशा कार्डाची सक्ती कशासाठी हा प्रश्न आहे. सवलतींच्या प्रतिपूर्तीसाठी नेमकी किती रक्कम दिली जाते, ती किती लोकांपर्यंत पोहोचते, याची खातरजमा सरकारच्या अर्थ विभागाला हवी असेल, तर तो त्यांचा प्रश्न झाला. त्यासाठी लोकांना वेठीस धरण्याचे कारण नाही. खरेतर हा प्रश्न आपल्याकडे अनेक सेवांसाठी विचारला जाऊ शकतो. राज्यातील एसटी असो किंवा बेस्ट किंवा मेट्रो, अशी स्मार्टकार्ड सुरू करताना त्याला नॅशनल मोबिलिटी – किंवा राष्ट्रीय परिवहन असे बिरुद जोडले जाते. प्रत्यक्षात मात्र कित्येकदा ही कार्डे केवळ त्या सेवांपुरतीच चालतात.

एमएमआरडीएकडून पहिली मेट्रो रेल्वे उभारली जात होती, तेव्हापासून सर्व वाहतूक सुविधांसाठी सामाईक कार्डाच्या घोषणा केल्या गेल्या. मात्र रेल्वे, मेट्रो यांच्यात महसूलविभागणीवरून वाद असल्याची कारणे दिली गेली. तंत्रज्ञानातील धुरीणांच्या मते या अडचणीत काही तथ्य नाही. ऑयस्टरसारखे कार्ड लंडनमधील सर्व वाहतूकसुविधांमध्ये चालते. चीनसारख्या अवाढव्य देशात वीचॅट या ॲपद्वारे सर्व सेवा-सुविधांचा उपयोग, पैसेभरणा करता येतो. आज आपणही प्रगत तंत्रज्ञानावर स्वार झालो आहोत, हे पासपोर्ट सेवांमधील सुलभता आणि डीजी यात्रा या विमानतळांवरील ॲपची सुविधा यातून सिद्ध झाले आहे. पासपोर्ट सेवांमध्ये आज कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय मुलाखतीची वेळ, पैशाचा भरणा यापासून पासपोर्ट हातात पडेपर्यंत सर्व व्यवहार सुरळीत होतात. २०२२ पासून अस्तित्वात आलेल्या 'डीजीयात्रा' या तांत्रिकसुविधेचा विस्तार आज देशातील अनेक विमानतळांवर झाला असून तुमच्या आधार ओळखपत्राच्या अपलोडिंगपासून ते फोटोनुसार चेहरा ओळखण्यापर्यंत सर्व सुविधा एकछत्री आल्या. स्टार्टअप चॅलेंज स्पर्धेतून हे ॲप जन्मले, हे लक्षणीयच.

टाटा कर्करोग रुग्णालयाने रुग्णनोंदणी झाल्यापासून एका ओळखपत्रावर सर्व काउंटरवर रुग्णांचे तपासणीअहवाल, औषधे, डॉक्टरांची वेळनिश्चिती या सर्व सुविधा देण्यास सुरुवात केली, त्यासही आता किमान दहा वर्षे तरी लोटली. खरेतर एक आधार कार्डद्वारे किंवा फारतर सर्व सुविधांसाठी एकच कार्ड ठेवून त्याद्वारे लाभ द्यायला हवेत. त्या कार्डाद्वारे संबंधित सेवापुरवठादारांना रक्कम चुकती होणे, हे इतके कठीण जाऊ नये. डेटाचोरी, अफरातफर यांची जोखीम तर आहेच, परंतु असे घोटाळेबहाद्दर तर आताही वेगवेगळ्या लिंक वापरून लोकांना गंडा घालत आहेत. तोतयागिरीचा मुद्दा असेल, तर लाडकी बहीणपासून शेतकरी कर्जमाफीपर्यंत हजारो-लाखोंच्या संख्येने अपात्रांनी घुसखोरी केलीच. तांत्रिक सुरक्षेची तटबंदी करताना आपण अंतिम ग्राहकाची गैरसोय कशी टाळता येईल, हा मुद्दा पूर्णतः नजरेआड करत आहोत. लोकांना सुविधा द्यायच्या आहेत की त्रास, यावरच खल करण्याची गरज आहे.

**– समीर कर्वे**

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते.

विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्रेटिक इक्वेटर लाईन (चुंबकीय भूमध्य रेखा) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले.

विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा



आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले.

त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे (रॉकेट) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविशांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे.

त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी निमित्त विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वर्षावास : बुद्धांच्या धम्मापासून संविधानाच्या मूल्यांपर्यंतचा प्रवास

पाऊस सुरू झाला की निसर्गाचा चेहराच बदलतो. उन्हाने करपलेली धरती हिरवीगार होते. झाडांच्या फांद्यांवर नवी पालवी फुटते. नद्या वाहू लागतात. मातीचा सुगंध मनाला वेढून टाकतो. आकाशातून बरसणारा प्रत्येक थेंब जणू एकच संदेश देतो, जुने धुऊन काढा आणि नव्याला जागा द्या! बौद्ध परंपरेतील वर्षावास याच अर्थाने केवळ धार्मिक परंपरा नाही तर तो आत्मपरीक्षणाचा, संयमाचा, प्रबोधनाचा आणि सामाजिक जबाबदारीचा काळ आहे. भगवान बुद्धांच्या काळात पावसाळ्यात भिक्षूंनी एका ठिकाणी राहून साधना, अध्ययन, चिंतन आणि धम्मचर्चा करण्याची परंपरा विकसित झाली. या परंपरेच्या केंद्रस्थानी होती अहिंसा, करुणा, विवेक आणि आत्मशुद्धी. आज दोन हजार पाचशे वर्षांनंतर वर्षावासाकडे पाहताना त्याचा अर्थ आणखी व्यापक होतो. कारण बुद्धांचा धम्म आणि भारतीय संविधानाची मूल्यव्यवस्था यांच्यात एक मूलभूत समान धागा दिसतो, माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणे.

बुद्धांनी माणसाला जन्मावरून श्रेष्ठ-कनिष्ठ मानण्यास नकार दिला. त्यांनी कर्मकांडापेक्षा आचरणाला, अंधश्रद्धेपेक्षा विवेकाला आणि दैववादापेक्षा मानवी प्रयत्नांना महत्त्व दिले. संविधानानेही नागरिकाच्या जन्म, जात, धर्म, लिंग किंवा भाषेच्या आधारावर भेदभाव नाकारून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांना राष्ट्रजीवनाचा पाया दिला. म्हणूनच वर्षावास हा बुद्धांच्या धम्मातून संविधानाच्या मूल्यांकडे जाणारा एक वैचारिक पूल ठरू शकतो. वर्षावास म्हणजे स्वतःच्या मनाचा संविधान लिहिणे! संविधान देशासाठी कायदे आणि मूल्यांची चौकट निर्माण करते, पण समाजाचे खरे परिवर्तन केवळ कायद्याने होत नाही. कायद्यापेक्षा आधी माणसाच्या मनात बदल घडावा लागतो. संविधान म्हणते, सर्व नागरिक समान आहेत. पण आपल्या मनात अजूनही जातीय श्रेष्ठत्वाची भावना असेल तर समता कागदावरच राहते. संविधान स्वातंत्र्य देते, पण आपण दुसऱ्याच्या विचार स्वातंत्र्याचा आदर करीत नसू तर ते स्वातंत्र्य अपुरे ठरते. संविधान बंधुतेची भाषा करते, पण धर्म, जात आणि राजकीय मतभेदांच्या नावावर आपण एकमेकांचा द्वेष करत असू तर बंधुता कुठे उरते? म्हणूनच वर्षावासाचा काळ स्वतःला प्रश्न विचारण्याचा आहे, आपल्या मनात संविधान आहे का? हीच खरी परीक्षा आहे. भारतीय समाजात जातिभेदाच्या भिंती अतिशय जुन्या आहेत. जन्माच्या आधारावर माणसाची किंमत ठरविण्याची व्यवस्था शतकानुशतके समाजात रुजली. अशा काळात बुद्धांनी माणसाच्या मूल्याचे मोजमाप त्याच्या जन्माने नव्हे, तर त्याच्या आचरणाने केले, हा विचार क्रांतिकारी होता. बुद्धांच्या संघात विविध सामाजिक स्तरांतील लोकांना स्थान मिळाले. स्त्रियांनाही संघात प्रवेश देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. त्यामुळे बुद्धांचा धम्म हा केवळ आध्यात्मिक मुक्तीचा मार्ग नव्हता, तर तो मानवी प्रतिष्ठेचा आणि सामाजिक समतेचा विचार होता. याच मूल्यांची आधुनिक अभिव्यक्ती भारतीय संविधानात दिसते. संविधानातील समतेचा अधिकार हा केवळ कायदेशीर कलम नाही. तो हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेविरुद्धचा आधुनिक प्रतिकार आहे. म्हणून वर्षावासात बुद्धांना स्मरण करणे म्हणजे केवळ बुद्धवंदना नव्हे, तर बुद्धांच्या समतेच्या विचाराला आपल्या आचरणात उतरवणे होय.

**कलाकार**

व्हिडिओ कॅमेरे नीत
फिरत राहे प्रेक्षकांत
टाळ्यावाजवणारे ते
जोशा दिसतात हात

तुटती हलवून माना
कसे उत्साही दे दाद
कसली नाही ददात
रसिकजनाधन्यवाद

अभिमानानेसांगतात
हजर मी कार्यक्रमात
कौतुक करी स्वताचे
रे सगळे एका क्रमात

कलाकार ते करतात
मेहनत दिवस न् रात
मिळावी वाटते जागा
रसिकजनांच्या उरात

कलाकारांच्या सोबत
कैक फोटो काढतात
सोशल मिडियावरती
रे उत्साहात धाडतात

ख-याप्रेमाचा भुकेला
तो लांब राहे चारहात
अप्रतिम कलाकृतीस
कसे फसवे हातोहात

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

करुणा आणि बंधुता हे दोन शब्द असून एकच आत्मा आहे. बुद्धांच्या शिकवणीत करुणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दुसऱ्याच्या दुःखाकडे पाहून मन हेलावणे आणि त्या दुःखाच्या निवारणासाठी कृती करणे म्हणजे करुणा. संविधानाच्या उद्देशिकेतील 'बंधुता' हीदेखील याच मानवी संवेदनशीलतेची आधुनिक सामाजिक अभिव्यक्ती आहे. आज मात्र आपण विचित्र काळातून जात आहोत. एका माणसाचे दुःख दुसऱ्यासाठी मनोरंजन बनते. सोशल मीडियावर अपमानाचे व्हिडिओ व्हायरल होतात. एखाद्या व्यक्तीच्या जात-धर्मावरून त्याच्या वेदनेचे मूल्य ठरविले जाते. गरीब, शेतकरी, कामगार, स्थलांतरित, बेरोजगार तरुण किंवा वंचित समाजघटक यांच्या प्रश्नांकडे अनेकदा केवळ आकडेवारी म्हणून पाहिले जाते. अशा वेळी बुद्धांची करुणा आणि संविधानाची बंधुता दोन्ही आपल्याला एकच प्रश्न विचारतात तुला दुसऱ्याचे दुःख खरोखर जाणवते आहे का? जर उत्तर 'नाही' असेल, तर वर्षावास अजून संपलेला नाही. बुद्धांनी कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारू नका, असा विवेकवादी दृष्टिकोन दिला. विचार करा, तपासा, अनुभव घ्या आणि मग स्वीकारा, ही विचारपद्धती आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाशी जवळीक साधणारी आहे. भारतीय संविधान नागरिकांना वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक वृत्ती विकसित करण्याचे कर्तव्य सांगते. इथे बुद्ध आणि संविधान पुन्हा एकाच दिशेने उभे दिसतात. आज सोशल मीडिया अफवांनी भरलेला आहे. खोटी माहिती क्षणात हजारो लोकांपर्यंत पोहोचते. धर्माच्या, जातीय अस्मितेच्या किंवा राजकीय भावनांच्या नावावर तथ्यांपेक्षा भावनांना महत्त्व दिले जाते. अशा काळात वर्षावास म्हणजे विचारांचा उपवास देखील असायला हवा अफवांपासून, द्वेषापासून, अंधानुकरणापासून आणि पूर्वग्रहांपासून.

वर्षावासाच्या काळात विहारांमध्ये प्रवचन, धम्मचर्चा आणि ध्यानधारणा होतात. ही परंपरा महत्त्वाची आहे. पण तिची खरी फलश्रुती विहाराच्या चार भिंतींच्या बाहेर दिसली पाहिजे. वर्षावासाच्या निमित्ताने एखाद्या विद्यार्थ्याला पुस्तक मिळाले, एखाद्या व्यसनाधीन तरुणाला व्यसनमुक्तीचा मार्ग मिळाला, एखाद्या गरीब कुटुंबाला आधार मिळाला, एखाद्या मुलीच्या शिक्षणासाठी मदत झाली, एखाद्या अन्यायग्रस्त व्यक्तीला न्यायासाठी साथ मिळाली, एखाद्या गावात संविधानाचे वाचन झाले, तर तो वर्षावास अधिक अर्थपूर्ण ठरेल. धम्म जर समाजाच्या अश्रूंपर्यंत पोहोचत नसेल, तर तो केवळ प्रवचनात अडकलेला धम्म आहे. बुद्धांनी दुःख ओळखले आणि त्याच्या कारणांचा शोध घेतला. संविधानानेही सामाजिक अन्याय, विषमता आणि शोषणाविरुद्ध न्यायाची चौकट निर्माण केली. म्हणून आजच्या वर्षावासात ध्यानाबरोबर संविधान वाचले पाहिजे. बुद्धवंदनेबरोबर समतेची शपथ घेतली पाहिजे धम्मचर्चेबरोबर सामाजिक प्रश्नांवर चर्चा केली पाहिजे आणि करुणेबरोबर प्रत्यक्ष कृती केली पाहिजे.

आज धर्म हा अनेकदा माणसाला जोडण्याऐवजी विभाजित करण्यासाठी वापरला जातो. जातीय द्वेष, धार्मिक ध्रुवीकरण आणि असहिष्णुता वाढत असताना बुद्धांचा मध्यममार्ग अधिक महत्त्वाचा ठरतो. बुद्धांचा धम्म कोणावर विजय मिळविण्याची भाषा करत नाही; तो स्वतःच्या विकारांवर विजय मिळविण्याची भाषा करतो. आज आपल्याला इतर धर्मांशी लढण्यापेक्षा स्वतःच्या मनातील द्वेषाशी लढण्याची गरज आहे. दुसऱ्याच्या श्रद्धेचा अपमान करण्यापेक्षा स्वतःच्या अहंकाराचे परीक्षण करण्याची गरज आहे आणि संविधान बदलण्याची भाषा करण्यापेक्षा संविधानाच्या मूल्यांनुसार स्वतःला बदलण्याची गरज आहे. भारतीय संविधान हे केवळ शासन चालविण्याचे पुस्तक नाही. ते भारताने स्वतःला दिलेले नैतिक वचन आहे. न्याय प्रत्येकाला मिळावा, स्वातंत्र्य प्रत्येकाला अनुभवता यावे, समता प्रत्येकाला मिळावी आणि बंधुता प्रत्येकाच्या मनात रुजावी, ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात आणायची असतील तर बुद्धांचा विचार आपल्याला मोठी नैतिक ताकद देतो.

या वर्षावासात आपण किती प्रवचने ऐकली, किती कार्यक्रम केले, किती फुले वाहिली, किती बुद्धवंदना केल्या यापेक्षा एक प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे, तो म्हणजे आपल्या वागण्यात बुद्ध किती उतरले? आपल्या निर्णयात संविधान किती उतरले? आपल्या नात्यांत समता किती आली? आपल्या शब्दांत करुणा किती आली? आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य किती आले? जर या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची तयारी आपण केली, तर वर्षावास खऱ्या अर्थाने सुरू झाला असे समजावे. कारण वर्षावास हा पावसाळ्यातील मुक्काम नाही, तर तो मनुष्यत्वाच्या पुनर्जन्माची प्रक्रिया आहे. आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबासोबत आपण एक संकल्प करू या. द्वेष धुऊन काढू या, अंधश्रद्धेवर विवेकाची मशाल पेटवू या, जातिभेदाच्या भिंती पाडू या, करुणेने माणसाला माणसाशी जोडू या आणि बुद्धांच्या प्रज्ञेतून संविधानिक भारत घडवू या! कारण अखेरीस प्रश्न बुद्ध किती मोठे होते, हा नाही. प्रश्न हा आहे की, बुद्धांचा विचार आपल्याला किती मोठा माणूस बनवतो? आणि संविधान किती सुंदर आहे, हा देखील प्रश्न नाही. खरा प्रश्न असा आहे की, आपण संविधानातील मूल्यांनुसार किती सुंदर समाज घडवतो?याच आत्मपरीक्षणाचे नाववर्षावास!

बुद्धांची प्रज्ञा आपल्याला विवेक देते, बुद्धांची करुणा आपल्याला माणूस बनवते, बुद्धांची समता आपल्याला भेदाभेदापलीकडे नेते आणि संविधानाची न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये त्या विचारांना आधुनिक लोकशाहीची चौकट देतात. म्हणूनच वर्षावासाचा खरा अर्थ एका वाक्यात सांगायचा झाला तर बाहेर पावसाची प्रतीक्षा आणि आत परिवर्तनाची तयारी. पाऊस मातीला भिजवतो, तर विचार मनाला भिजवतात. पाऊस नदीला प्रवाह देतो, तर करुणा माणुसकीला प्रवाह देते. पाऊस धरतीला हिरवाई देतो, तर समता समाजाला नवी पालवी देते आणि संविधान त्या हिरवाईला न्यायाची दिशा देते. बुद्धांची प्रज्ञा, करुणा आणि समता आपल्या जीवनात रुजो, संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची मूल्ये आपल्या आचरणातून अधिक बळकट होवोत, हीच सदिच्छा!सर्वांना वर्षावासाच्या हार्दिक मंगलमय शुभेच्छा!

**– प्रवीण बागडे**
**नागपूर, मो.९९२३६२०९१९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांची साई सहारा रेस्टॉरंट ला सदिच्छा भेट



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१०, पेण (रायगड) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे हे रविवारी रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. मुंबई – गोवा महामार्गवरील जिते येथे पक्षाच्या रायगड जिल्हा कार्यालयाचे उदघाटन केल्यानंतर पक्ष प्रमुख राज ठाकरे यांनी  साई सहारा रेस्टॉरंट येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या बरोबर संदीप देशपांडे, योगेश परुळेकर, राजेश येरुणकर यांच्या सह पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. साई सहारा रेस्टॉरंट चे मालक व मुंबई – गोवा महामार्गवरील अपघातग्रस्तांचे मदतगार कल्पेश ठाकूर यांनी शाल, पुष्पगुछ व सन्मान चिन्ह देऊन राज ठाकरे यांचा सत्कार केला.कल्पेश ठाकूर यांच्या महामार्गवरील मदतीचा, कोरोना काळात केलेल्या मदतीची माहिती नेते संदीप देशपांडे यांनी राज ठाकरे यांना दिल्या नंतर राज ठाकरे यांनी या बद्दल उत्सुकतेने अधिक माहिती जाणून घेतली व कौतुकाची थाप कल्पेश यांच्या पाठीवर मारली व ते करत असलेल्या कार्याचे कौतुक केले. अत्यंत छोट्या वयात मराठी माणसाने हॉटेल व्यवसायात उतुंग झेप घेतल्या बद्दल देखील राज ठाकरे यांनी कल्पेश ठाकूर यांचे मनसोक्त कौतुक केले. यानंतर साई सहारा रेस्टॉरंट मध्ये उभारण्यात आलेल्या साई मंदिरात साईंचे दर्शन देखील मनोभावे घेतले.

### जागतिक आदिवासी दिनानिमित्त चिंतलधाबा येते रक्त दान शिबीर संपन्न



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१०, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** पोंभुर्णा तालुक्यातील चिंतलधाबा येते जागतिक आदिवासी दिनानिमित्त निःस्वार्थ ग्रुप चिंतल धाबा तर्फे रक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले. आदिवासी दिनानिमित्त सतत ९ वर्ष रक्तदान शिबिर आयोजन करून निःस्वार्थ ग्रुप ने आदर्श घडवून सामाजिक बांधिलकी जपली. ३३ रक्तदात्यांनीरक्तदान केल. रक्त दाणामुळे गरजू रुग्णाणा मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगतिले. या शिबिराला शुभांगी कुतरमारे प्रशासक ग्रा.पंचायत चिंतलधाबा रोशन ठेंगणे, माजी उप सरपंच अतुल कोसारकर व निःस्वार्थ ग्रुपचे सर्व सदस्य, व्यापारी वर्ग, आरोग्य विभागाचे कर्मचारी व गावकरी उपस्थित होते.

### श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय किन्होळा येथे पालक सभा संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, किन्होळा (बुलढाणा) :** श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय किन्होळा येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत वाचनालय कक्ष व पालक सभा संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे सदस्य डॉ.विकास बाहेकर हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा.जगदेवरावजी बाहेकर आजीवन सभासद श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तसेच प्रभूकाका बाहेकर शाळा समिती सदस्य, दिनकर नाना बाहेकर, राजूभाऊ बाहेकर व राजेंद्र बिडवे, RB मराठी संवाद चैनल चिखली तसेच किन्होळा, वाडी ब्रह्मपुरी व गावठाणा येथील बहुसंख्य पालक उपस्थित होते.

सुरुवातीलाच सर्व मान्यवरांचे कुंकुम तिलक लावून स्वागत करण्यात आले. मान्यवरांनी बालचित्रकला स्पर्धा कक्षाला भेट देऊन सहभागी विद्यार्थ्यांशी संपर्क साधला व शुभेच्छा दिल्या. त्यानंतर प्राचार्य जी एच राजपूत सर यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या वाचनालय कक्षाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. विविध मासिके, पुस्तके, कथा, कादंबरी व विविध वाचनीय पुस्तकांचा संग्रह विद्यार्थ्यांसाठी आज खुला करून देण्यात आला. सर्वांनी या उपक्रमाचे मन भरून कौतुक केले. त्यानंतर पालक सभा घेण्यात आली सर्व मान्यवर अतिथींचा शाळेच्या वतीने प्राचार्य जी.एच.राजपूत यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. पुरुष पालक प्रतिनिधी व महिला पालक प्रतिनिधी यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर विविध पालकांनी आपले मनोगत व्यक्त करून शाळेने कोणते उपक्रम राबवावे.

या संदर्भात सूचना दिल्या व राजपूत आल्यानंतर १५ दिवसात झालेला बदल हा ही पालकांनी अधोरेखित केला. त्यानंतर शाळेचे प्राचार्य राजपूत सर यांनी आपल्या मनोगतातून कमी दिवसात  लोकसहभागातून केलेली कामे सांगून शाळेतील भौतिक सुविधांविषयी असलेली माहिती पालकांना दिले विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिस्त व गुणवत्तापूर्ण शिक्षण ही काळाची गरज असून त्या अनुषंगाने पुढील काळात आमचे विद्यालय याच्याशी कटिबद्ध राहील ही विश्वास पालकांना दिला.

या शैक्षणिक सत्रात करावयाच्या विविध कामाचा आढावा त्यांनी सभेसमोर मांडला. त्यानंतर प्रा.जगदेवराव बाहेकर यांनी शाळेचा पूर्व इतिहास सांगून गावाला शिक्षणाची असलेली उज्वल परंपरा विशद केली. प्राचार्य व सर्व शिक्षकांनी मनापासून काम केले तर शाळेची प्रगती निश्चित होईल हा आशावादही त्यांनी मांडला. त्यानंतर अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. विकास बाहेकर यांनी गावाची शैक्षणिक परंपरा व याच शाळेने आतापर्यंत घडविलेले विद्यार्थी व मराठी शाळेचे महत्त्व पालकांसमोर मांडले नव्याने रुजू झालेले प्राचार्य व सर्व टीमला त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर लोकसहभाग म्हणून आजीवन सभासद जगदेवराव बाहेकर यांनी ११११११ रुपये प्राचार्यांकडे चेक द्वारे सुपूर्द केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रशांत हिंगे यांनी केले. त्यानंतर नाश्ता व चहा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका श्री परिहार, श्री चव्हाण, पराग जाधव, श्री पडघान, सावळे, विवेक जाधव, पडघान मॅडम, मवाळ मॅडम, सोनवणे मॅडम, जाधव मॅडम, गजूभाऊ शेळके व शेख अनीस या सर्वांनी खूप परिश्रम केले.

# पाणी, रस्ते, वीजेच्या प्रश्नांवर विखे आक्रमक; पारनेरकरांना तातडीने न्याय देण्याचे निर्देश

## अधिकारी निष्क्रीय राहिल्यास जनता माफ करणार नाही – पालकमंत्र्यांचा इशारा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** अधिकारी निष्क्रीय झाले की लोकांच्या भावनांचा उद्रेक होतो. प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्याच्या भूमिकेतून काम करण्याचे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले. पारनेर तालुक्यात ना. विखे पाटील यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठक झाली.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, भाजपचे अध्यक्ष राहुल शिंदे, सुजित झावरे, विश्वनाथ कोरडे, अशोक सावंत यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. तालुक्यातील पाणी, वीज, रस्ते आणि औद्योगिक वसाहतीसंदर्भातील नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची दखल घेत ना. विखे पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

औद्योगिक वसाहतीतून तलावात सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याची प्राताधिकार्यांनी तातडीने चौकशी करून अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाला पाठवावा, असे निर्देश त्यांनी दिले. जामगाव येथे टँकची मागणी असतानाही निर्णय न झाल्याबद्दल गटविकास अधिकारी सोनकुसळे यांना चुकीची माहिती दिल्याबद्दल ना. विखे पाटील यांनी कडक शब्दांत ताळी देऊन तातडीने टँकर सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

शहरातील रस्त्यांची कामे दुभाजकासह पूर्ण करावीत तसेच पावसामुळे पडलेले मोठे खड्डे तातडीने बुजवून नागरिकांची गैरसोय दूर करावी, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तालुक्यातील ६ उपसा सिंचन योजनांना जलसंपदा विभागाने मंजुरी दिली असून, त्यापैकी तीन योजनांना मूळ धरणातून पाणी उपलब्ध होत आहे. उर्वरित तीन योजनांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याबत लवकरच निर्णय होईल. पिंपळगाव जोगा धरणातून पाणी सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, पाण्याच्या दुर्स्तीसाठी १०२ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले. आमदार काशिनाथ दाते यांनी अधिकाऱ्यांनी कामाबत गांभीर्य दाखवावे आणि नागरिकांना कामासाठी हेलपाटे मारायला लावू नये, असे सांगितले. तसेच बीड भारनियमनाचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती पालकमंत्र्यांकडे केली.

यापूर्वी तालुक्यात केवळ खंडणीचे राजकारण होते, योजना कागदावर होत्या.

आता तालुक्याची परिस्थिती बदलत असून गुंडगिरी हद्दपार होऊन विकासकामे होत आहेत. आमदार काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून आणखी मोठ्या प्रमाणात कामे होणार असून निधी कमी पडू देणार नाही.

नागरिकांनी व्यक्त केलेल्या सर्व अपेक्षा पूर्ण करण्याची ग्वाही ना.विखे पाटील यांनी दिली.

# अतिरिक्त पाणी निर्माण करून पारनेर दुष्काळमुक्त करू - ना.राधाकृष्ण विखे पाटील

## जवळा येथे कुकडी कालव्याच्या नूतनीकरणाचा शुभारंभ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** कुकडी प्रकल्पातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी अतिरिक्त पाणी निर्माण करण्याचे प्रयत्न महायुती सरकार करीत असून, राज्यातील दुष्काळ आता भूतकाळात जाईल, असा विश्वास जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. जवळा येथे कुकडी लाभक्षेत्रातील डाव्या कालव्याच्या नूतनीकरणाचा शुभारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत झाला.यावेळी आमदार काशिनाथ दाते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. गांधी भोयरे येथे रस्ते विकासकाम ाचे लोकार्पणही करण्यात आले.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, पारनेर तालुका दुष्काळमुक्त करण्याचे काम जलसंपदा विभागाने हाती घेतले आहे. सहा उपसा सिंचन योजनांना मंजुरी देण्यात आली असून, पाण्याची उपलब्धता करून त्या कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे. कालवा नूतनीकरणामुळे गळती थांबून पाण्याची वहन क्षमता वाढणार आहे. धरणांची साठवण क्षमता वाढविण्यासह अतिरिक्त पाणी निर्माण करणे सरकारचे उद्दिष्ट आहे. महायुती सरकारच्या कर्जमाफी व वीजबिलमाफीच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना नवी संधी मिळणार असून, पारनेर तालुक्यातील ३,२०० शेतकऱ्यांना २४ कोटी रुपये मंजूर झाल्याचे त्यांनी सांगितले.

पारनेर सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा राहिला पाहिजे, अशी भूमिका तालुक्यातील शेतकऱ्यांनी यापूर्वी घ्यायला हवी होती, असेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

# सेनापती बापट पतसंस्थेविरोधात ठेवीदारांचे उपोषण

## २०० कोटी अडकले; प्रशासक, अवसायक नेमण्यासह फॉरेन्सिक ऑडिटची मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** विधानसभेचे माजी उपाध्यक्ष व पारनेरचे माजी आमदार विजय भास्कर ओटी संस्थापक असलेल्या सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या कारभाराची सखोल चौकशी करून ठेवीदारांना न्याय द्यावा, तसेच संस्थेवर प्रशासक व अवसायक नेमावा, या मागणीसाठी दिनांक ०९ ऑगस्ट २०२६ रोजी ठेवीदारांनी पतसंस्थेच्या शाखेसमोर उपोषण करून आंदोलनाला सुरुवात केली. शिवराय प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष विनोद गोळे यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.

संस्थेच्या ठेवीदारांच्या सुमारे दोनशे कोटी रुपयांच्या ठेवी अडकल्या असून, गेल्या २ वर्षांपासून ठेवीदार आंदोलन करीत आहेत. संस्थेचे अध्यक्ष रामदास भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास झंजाड यांच्यासह संचालक मंडळावर गुन्हा दाखल असून सध्या फॉरेन्सिक ऑडिट सुरू आहे. तरीही संस्थेच्या मालमत्तांची बेकायदेशीर विक्री झाल्याचा आरोपही ठेवीदारांनी केला आहे. त्यामुळे उपोषण केले असल्याचे ठेवीदारांनी सांगितले.

दरम्यान, १२ व १२ ऑगस्ट रोजी आमदार, खासदार व विविध राजकीय नेत्यांना, तर १४ ऑगस्ट रोजी पालकमंत्री, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदने देण्यात येणार असल्याचे विनोद गोळे यांनी सांगितले.

**सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेवर तातडीने प्रशासक व अवसायक नेमावा, विक्री केलेल्या मालमत्तांची खरेदी रद्द करावी, थकीत कर्जदारांकडून कर्जवसुली करून ठेवीदारांच्या ठेवी परत कराव्यात, फॉरेन्सिक ऑडिट तातडीने पूर्ण करून दोषी संचालक मंडळ व संबंधित कर्मचाऱ्यांच्या मालमत्ता जप्त कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.**

# संकल्प संस्थेच्या पॅरा कौन्सिलिंग कोर्सच्या प्रथम बॅचचा प्रमाणपत्र वितरण, निरोप सोहळा संपन्न

**अक्षराज ; प्रतिनिधी**

**दि.१०, कुर्ला (मुं.उपनगर) :** संकल्प संस्था आयोजित पॅरा कौन्सिलिंग कोर्सच्या प्रथम बॅचचा प्रमाणपत्र वितरण, निरोप व समारोप सोहळादिनांक ०९ ऑगस्ट २०२६ रोजी शांताराम कृष्णाजी पंत वालावलकर माध्यमिक विद्यालय (न्यू इंग्लिश स्कूल), नेहरू नगर, कुर्ला (पूर्व) येथे उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला.संकल्प संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या पुढाकाराने आयोजित या प्रशिक्षणात समुपदेशनाची मूलभूत तत्त्वे, मानसिक आरोग्य, प्रभावी संवाद, व्यसनमुक्ती, आत्महत्या प्रतिबंध, ट्रॉमा कौन्सिलिंग, करिअर मार्गदर्शन, जीवन कौशल्ये, कायदेविषयक माहिती, सरकारी योजना, नेतृत्व व टीमवर्क, डिजिटल कौन्सिलिंग आदी २८ महत्त्वपूर्ण विषयांवर १८ तज्ज्ञांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. विविध प्रात्यक्षिके, संवादात्मक सत्रे आणि शैक्षणिक क्षेत्रभेटींच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष अनुभव देण्यावर विशेष भर देण्यात आला.

समारोप सोहळ्यास प्रमुख अतिथी डॉ. भाग्येश लाड तसेच विशेष अतिथी हिंदी व मराठी चित्रपट व मालिकांतील प्रसिद्ध चरित्र अभिनेता राजदेव जमदाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकल्प संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष विनोद हिवाळे होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संकल्प संस्थेच्या सचिव सविता हेंडवे यांनी केले. त्यांनी संपूर्ण प्रशिक्षण प्रवासाचा आढावा घेत प्रशिक्षणामागील उद्देश आणि प्रशिक्षणार्थींच्या सहभागाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशोधरा साळवे व संतोष कुलकर्णी यांनी केले.मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून समुपदेशन क्षेत्रात संवेदनशीलता, संयम, सहानुभूती, प्रभावी संवाद आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान केवळ प्रमाणपत्रापुरते मर्यादित न ठेवता समाजातील गरजू, अडचणीत असलेल्या व्यक्ती व कुटुंबांना योग्य मार्गदर्शन आणि मानसिक आधार देण्यासाठी त्याचा उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी प्रशिक्षणार्थींना केले.

यावेळी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रशिक्षणार्थी निकिता घोलप, रेश्मा



काझी व अफरोज शेख, तसेच प्रशिक्षण आयोजक दीपा गमरे व वनिता सावंत यांनी मनोगत व्यक्त करत प्रशिक्षणातील अनुभवांना उजाळा दिला. या कोर्समुळे व्यक्तिमत्त्व, विचारपद्धती, आत्मविश्वास आणि सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल झाल्याची भावना प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केली. समारंभात प्रवीण रुपवते यांनी गीत सादर केले, तर अशोक धात्रे यांनी कविता सादर करून कार्यक्रमात विशेष रंगत आणली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुनील कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्नेहा कासारे, अश्विनी घुमरे आणि वैशाली वाघ यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच संतोष कांबळे, प्रदीप रणदिवे, सूर्यकांत चव्हाण, अविनाश पाटील, रेणुका सिंग, सुप्रभा गायकवाड आणि सुवर्णा सोरटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# ४ महिन्यांपासून अपंगांचे मानधन रखडले

## जिंतूर तालुक्यात ५ हजार लाभार्थी वंचित! 'साइट बंद आहे' अधिकाऱ्यांचे कारण

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१०, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना गेल्या ४ महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने जवळपास ५ हजार लाभार्थी आर्थिक मदतीपासून वंचित आहेत. मानधन कधी मिळणार, यासाठी दिव्यांग बांधव तहसील कार्यालयाच्या वारंवार चकरा मारत असून, आता ते अक्षरशः बेजार झाले आहेत. मानधनाबाबत विचारणा करण्यासाठी तहसील कार्यालयात गेलेल्या लाभार्थ्यांना संबंधित अधिकाऱ्यांकडून 'साइट बंद आहे', 'ऑनलाइन प्रक्रिया होत नाही', 'साइट सुरू झाल्यावर काम होईल' अशी कारणे सांगितली जात असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. मात्र चार महिने उलटूनही समस्या कायम असल्याने दिव्यांग बांधवांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



**हयात असल्याचा अर्ज करूनही मानधन नाही**

मानधन सुरू राहण्यासाठी अनेक दिव्यांग लाभार्थ्यांनी हयात असल्याचा अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आहे. तरीदेखील त्यांच्या खात्यावर मानधन जमा झालेले नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.शासकीय कार्यालयात वारंवार जाणे हे सर्वसामान्य नागरिकांसाठीही त्रासदायक असते; मात्र शारीरिक अडचणी असलेल्या दिव्यांग नागरिकांना तहसील कार्यालयाच्या सतत चकरा माराव्या लागत असल्याने त्यांचा त्रास आणखी वाढला आहे.

**'साइट बंद' मग लाभार्थ्यांनी काय करायचे?**

४ महिन्यांपासून मानधन रखडले असताना केवळ 'साइट बंद आहे' असे कारण देऊन प्रशासनाची जबाबदारी संपते का? साइट बंद असेल तर पर्यायी व्यवस्था काय? लाभार्थ्यांचे प्रलंबित मानधन कधी मिळणार? याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करण्याची गरज आहे.

दिव्यांग नागरिकांसाठी मिळणारे मानधन त्यांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. औषधोपचार, घरखर्च आणि इतर आवश्यक गरजांसाठी अनेक लाभार्थी या रकमेवर अवलंबून आहेत. चार महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने त्यांच्या आर्थिक अडचणी गंभीर झाल्या आहेत.


**तहसीलच्या चकरा थांबवा, मानधन तातडीने द्या!**

जिंतूर तालुक्यातील जवळपास ५ हजार दिव्यांग लाभार्थ्यांचे चार महिन्यांचे थकीत मानधन तातडीने त्यांच्या खात्यावर जमा करावे, तसेच वारंवार तहसील कार्यालयात चकरा मारण्याची वेळ दिव्यांग नागरिकांवर येऊ नये, अशी मागणी होत आहे.'साइट बंद' या कारणाआड दिव्यांगांच्या हक्काचे मानधन आणखी किती दिवस रखडणार? असा संतप्त सवाल आता लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

## स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त मोफत आरोग्यसेवा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** कर्मयोगी श्रद्धेय स्व. सुधाकरपंत परिचारक (मालक) यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया (लेन्ससहित) तसेच सर्वरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत तालुक्यातील १० ठिकाणी हे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती पांडुरंग परिवाराचे युवा नेते प्रणव परिचारक यांनी दिली.पांडुरंग परिवार युवक आघाडी व प्रणव परिवार युवा मंच, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित या शिबिराला शंकरराव साळवे नेत्र रुग्णालय, सोलापूर (एच. व्ही. देसाई आय इन्स्टिट्यूटचा प्रकल्प) यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून



नागरिकांना त्यांच्या गावाजवळच तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात येणार आहेत. सोलापूर व पुणे येथील तज्ज्ञ डॉक्टर या शिबिरांमध्ये उपस्थित राहून नागरिकांची तपासणी व आवश्यक मार्गदर्शन करणार आहेत. विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांपासून 'मोतीबिंदूमुक्त व डोळस पंढरपूर तालुका' करण्याचा संकल्प प्रणव परिचारक यांच्या माध्यमातून राबविला जात आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना नेत्र तपासणीपासून मोतीबिंदू शस्त्रक्रियेपर्यंतची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.१० गावांत आरोग्य शिबिरांचा धडाकानेत्र व आरोग्य तपासणी शिबिराची सुरुवात ११ ऑगस्ट रोजी तुंगत येथून होणार आहे. त्यानंतर १२ ऑगस्ट रोजी गादेगाव, १३ ऑगस्ट रोजी खर्डी, १४ ऑगस्ट रोजी उंबरे-पागे, १६ ऑगस्ट रोजी रांजणी येथे शिबिर होईल.त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी कासेगाव, १९ ऑगस्ट रोजी रोपळे, २० ऑगस्ट रोजी पुळुज, २१ ऑगस्ट रोजी करकंब ग्रामीण रुग्णालय आणि २२ ऑगस्ट रोजी भाळवणी येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, भाळवणी येथे या आरोग्य उपक्रमाचा समारोप होणार आहे.

**मोतीबिंदू आढळल्यास पुढील उपचार ही मोफत**

शिबिरामध्ये नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात येणार असून, मोतीबिंदू आढळल्यास पुढील मोफत शस्त्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. अद्ययावत सर्वोपचार रुग्णालयात रुग्णांना मोफत नेऊन मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून देण्यात येणार आहे. याशिवाय विविध आजारांची तपासणी करून तज्ज्ञ डॉक्टरांकडून आवश्यक मार्गदर्शन केले जाणार आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन प्रणव परिचारक यांच्या वतीने करण्यात आले आहे. स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या सामाजिक कार्याच्या स्मृती जपत आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असल्याने या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## शहापुरात सीटू-किसान सभेचा एल्गार; हजारो कामगार, शेतकऱ्यांची तहसील कार्यालयावर धडक

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१०, शहापुर (ठाणे) :** शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी, योजना कर्मचारी आणि सर्वसामान्य जनतेच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी भारतीय ट्रेड युनियन केंद्र (सीटू) आणि अखिल भारतीय किसान सभा, शहापूर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी शहापूर बसस्थानक ते तहसील कार्यालय असा भव्य मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर तहसील कार्यालयासमोर 'जेलभरो' आंदोलन करण्यात आले.



**शेतमालाला हमीभावाची मागणी**

स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार सी-२ खर्चावर ५० टक्के नफा धरून शेतमालाला हमीभाव द्यावा आणि सर्व पिकांची हमीभावाने खरेदी करावी, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र दावे मंजूर करावेत, गायरान, देवस्थान, इनामी व इतर सरकारी जमिनीवरील पात्र अतिक्रमणे नियमित करावीत, तसेच २०२५-२६ मधील प्रलंबित बोनस व अनुदान तातडीने जमा करावे, अशी मागणी करण्यात आली.

**स्मार्ट मीटर योजना रद्द करावी.**

महाराष्ट्रातील स्मार्ट मीटर योजना रद्द करून शहापूरसह राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया थांबवावी, लोडशेडिंग बंद करून २४ तास दर्जेदार वीज द्यावी, निकृष्ट सार्वजनिक कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, महागाई नियंत्रणात आणावी आणि बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशा मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या. नीट व इतर परीक्षांमधील पेपरफुटीची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी ही करण्यात आली.

**कामगारांचे विविध प्रश्न.**

चार नवीन श्रमसंहिता रद्द कराव्यात, ८ तासांच्या कामासाठी किमान ३० हजार रुपये वेतन लागू करावे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करून समान कामास समान वेतन द्यावे, योजना कर्मचाऱ्यांना कायम करून ईएसआय, पीएफ व पेन्शन लागू करावी आणि असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली. शहापूर तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रात किमान वेतन कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करून वेतनचोरी थांबवावी, किन्हवली उड्डाणपुलाचे रुंदीकरण करावे, आटगाव-आसनगाव औद्योगिक परिसरात स्थानिकांना रोजगार द्यावा, आवरे-जांभुळपाडा कॅनल रोड पूर्ण करावा, तळेखण येथे धरण अथवा बंधारा उभारावा आणि ओमसाई हॉटेल ते चेरपोली ग्रामपंचायत परिसरातील गटाराचे काम तातडीने सुरू करावे,साखरोली येथील वीज पोल व तारा बदलणे, प्रलंबित डावा कालवा कार्यान्वित करणे, शहापूर येथे एडखउ बहुविशेषज्ञ रुग्णालय उभारणे, मिंडा कॉर्पोरेशनमधील युनियनला मान्यता देणे, लॉयड इंजिनिअरिंगमधील बाहेर ठेवलेल्या कामगारांना कामावर घेणे तसेच स्पार्टन कंपनीतील युनियन सभासद कामगारांना तातडीने कामावर घेणे, अशा मागण्याही करण्यात आल्या.

रस्त्यांवरील खड्डे बुजवणे.शहापूर - मुरबाड पाटगाव महामार्गावरील कोळकेवाडी व नडगाव-भटपाडा परिसरातील मोठे खड्डे तातडीने बुजवून रस्त्याचे काँक्रीटीकरण करावे, शहापूर-सापगाव मार्गावरील खड्डे भरून रस्ता अपघातमुक्त करावा आणि एरो फार्म कंपनी तातडीने सुरू करून सर्व कामगारांना कामावर घ्यावे, मुरबाड तालुक्यातील देवगाव हद्दीतील म्हाडाने संपादित केलेली मात्र विनावापर असलेली जमीन मूळ मालकांना परत करून सातबारा दप्तरी मूळ मालकीच्या नावाची नोंद करावी, अशी मागणीही करण्यात आली.

या जेलभरो आंदोलनाचे नेतृत्व व महत्त्वपूर्ण मार्गदर्शन सीटूचे राज्य कमिटी सदस्य कॉ. विजय विशे आणि माकपाचे सेक्रेटरी कॉ. कृष्णा भवर यांनी केले. यावेळी महाराष्ट्र इंजिनिअरिंगचे जनरल सेक्रेटरी कॉ.अशोक विशे, सीटूचे तालुका सरचिटणीस कॉ. मनिष फोडसे, किसान सभा तालुका अध्यक्ष संतोष भागरे, किसान सभा तालुका अध्यक्ष नंदू खानजोडे, मुरबाड तालुका सरचिटणीस कॉ. सागर भावर्थे आणि कॉ. जगन भालेराव यांनी आंदोलनाला विशेष मार्गदर्शन केले.आंदोलनास मोहन बांगर, नितीन गाडेकर, रघुनाथ खाडे, रमेश धसाडे, प्रदीप भोईर, किरण घावट, सुभाष विशे यांच्यासह सीटूचे हजारो कामगार आणि किसान सभेचे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाने मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा तसेच स्थानिक मागण्यांवर तहसीलदारांनी आपल्या स्तरावर त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे तसेच मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. राज्यस्तरीय तसेच स्थानिक मागण्यांचे निवेदन तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आले. यावेळी तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी कंपनी मालक यांची त्यांच्या दालनात बैठक बोलवून किमान वेतनाची अंमलबजावणी करायला तसेच कामगार कायद्याचे पालन करण्यासाठी विशेष बैठक बोलवु असे सांगितले तर नडगाव-कोळकेवाडी रस्ता लवकरच दुरूस्त करण्यात येईल असे सांगितले.

## थोडक्यात बातम्या

### विश्वबंधुता साहित्य परिषदेच्या वतीने अविनाश पवार यांना'विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार' प्रदान

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** 'विश्वबंधुतेचा तिरंगा महोत्सव २०२६'च्या पार्श्वभूमीवर पुणे येथे आयोजित एका विशेष आणि दिमाखदार सोहळ्यात, 'विश्वबंधुता साहित्य परिषद, पुणे' तसेच 'विश्वबंधुता काव्यमंच आणि काव्य प्रकाशन' यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी बंधुताचार्य प्रकाश रोकडे,ॲड प्रार्थना सदावर्ते यांच्या हस्ते अविनाश पवार यांना मानाचा 'विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार' मोठ्या उत्साहात प्रदान करण्यात आला. यावेळी स्वागत अध्यक्ष डॉ.बंडोपंत कांबळे, ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत वानखेडे, कवयित्री संगीता झिंजुरके, प्रा. शंकर अथरे, मंदाकिनी रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार सोहळा पुणे शहरात अत्यंत प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. अविनाश पवार यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या गौरवपूर्ण कामगिरीमुळे पारनेर तालुक्यात गौरव होत आहे. सन्मानपत्रातील गौरवोद्गार आणि संविधानिक मूल्यांची जोपासनाया कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले अविनाश पवार यांना प्रदान करण्यात आलेले सन्मानपत्र. या सन्मानपत्रात त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याचा अतिशय मार्मिक शब्दात गौरव करण्यात आला आहे. आजच्या बदलत्या काळात सत्तेच्या विरोधात जाऊन लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे आणि तळागाळातील लोकांपर्यंत समतेचा संदेश पोहोचवणे, हे सामाजिक कार्यकर्तेचे कर्तव्य असते; आणि हेच कर्तव्य अविनाश पवार यांनी सामाजिक कार्यात चोख बजावले आहे, असा सूर याप्रसंगी उपस्थितांनी व्यक्त केला.या संमेलनाला व पुरस्कार वितरण सोहळ्याला पुणे आणि परिसरातील अनेक नामांकित साहित्यिक, विचारवंत, कवी, तसेच सामाजिक क्षेत्रातील दिग्गज मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वबंधुता साहित्य परिषदेचे पदाधिकारी आणि काव्यमंचाचे कार्यकर्ते यांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



### श्रीधर मढवी यांच्या बासरीवादनाने रंगली ५० वर्षांनंतरची शाळकरी मित्रांची मैफील

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१०, जुईनगर (नवी मुंबई) :** तब्बल ५० वर्षांनंतर तुर्भे हायस्कूलच्या १९७६-७७ SSC बॅचमधील १० शाळकरी मित्रांची पुन्हा एकदा भेट झाली. जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'SSC ७६-७७ बॅच मित्रमंडळी' या व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून सर्व मित्र एकत्र आले. नुकतेचसर्व मित्र नेरे येथील एका मित्राच्या फार्महाऊसवर जमले. त्यापूर्वी आकुर्ली येथे एका मित्राच्या घरी सर्वजण एकत्र आले. तब्बल पाच दशकांनंतर भेटल्यामुळे एकमेकांचे बदललेले चेहरे पाहून जुन्या आठवणी जाग्या झाल्या. नाश्ता व कॉफीनंतर सर्वजण नेरेला रवाना झाले.फार्महाऊसवर पोहोचल्यानंतर सर्वांनी मिळून सहभोजनाची तयारी केली. यावेळी नंदकुमार सुतार आणि श्रीधर मढवी यांनी बासरीवादन सादर करून वातावरणात सुरांची रंगत भरली. त्यानंतर जुन्या आठवणी, शाळेतील किस्से आणि मनमोकळ्या गप्पांमध्ये वेळ कसा निघून गेला, हे कोणालाच कळले नाही. या भेटीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे दहा मित्रांपैकी सात जण शाकाहारी होते. कोणत्याही प्रकारच्या अनावश्यक दिखाव्यापेक्षा मैत्री, साधेपणा आणि सहभोजनाला प्राधान्य देत या मित्रांनी एक आदर्श निर्माण केला. फार्महाऊसच्या टेरेसवरून दिसणारे निसर्गसौंदर्य कॅमेऱ्यात टिपत मित्रांनी या अविस्मरणीय भेटीच्या आठवणी जपल्या. अखेर संध्याकाळी सहाच्या सुमारास सर्वजण पुन्हा शाळकरी मुलांसारख्या उत्साहात आणि आनंदात आपापल्या घरी परतले. ५० वर्षांचे अंतर पार करून पुन्हा एकत्र आलेली ही मैत्रीची भेट सर्वांसाठी कायमस्वरूपी आठवण ठरली.



### मोठे वेणगांव येथे रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.१०, कर्जत (रायगड) :** राणाप्रताप मित्र मंडळ, मोठे वेणगांव यांच्या वतीने कै. प्रितेश हरिश्चंद्र शिंदे यांच्या स्मरणार्थ नवव्या वर्षानिमित्त समर्पण रक्तकेंद्र, घाटकोपर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कर्जत-खालापूर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ कोठारी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेले हे ५४४ वे रक्तदान शिबिर दिनांक ०९ ऑगस्ट २०२६ रोजी विठ्ठल मंदिर, मोठे वेणगांव येथे सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत पार पडले. या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, एकूण ३३ रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय, सामाजिक आणि मानवतावादी कार्यात मोलाचे योगदान दिले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे राणाप्रताप मित्र मंडळाच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.



यावेळी राणाप्रताप मित्र मंडळाचे अध्यक्ष जितेश आंब्रे, उपाध्यक्ष वैभव सावंत, तसेच प्रशांत शिंदे, मंदार सावंत, कैलास शिंदे, हरीश जाधव, नितीन गवसकर, मनोज सावंत, किशोर शिंदे, समीर शिंदे, जयवंत केलटकर, रुपेश चव्हाण आदी उपस्थित होते.तसेच जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते, प्रशांत उगले आणि पत्रकार प्रशांत खराडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचे मनोबल वाढविले. त्यांच्या उपस्थितीबद्दलही मंडळाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्राचे डॉ. रमेश सिंघ, अनिता सिस्टर, शिला वाघमारे, प्रदीप नितोरे, दिपेश सरदार, लक्ष्मणकाका नाईक तसेच इतर आरोग्य सेवकांनी उत्तम पद्धतीने पार पाडले. त्यांच्या सेवाभावी योगदानाबद्दल आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राणाप्रताप मित्र मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मेहनतीमुळे शिबिर यशस्वीपणे पार पडले.एकदा रक्तदान, देईल तिघांना जीवनदानविसरुनी जाती-धर्म सारे, रक्तदान करूनिया एक होऊ यारे!या सामाजिक उपक्रमातून रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनीही नियमित रक्तदान करून मानवतावादी कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.